# उपविभागीय अधिकारी, अमरावती यांचे कार्यालय

वाचा :१) मा.अपर जिल्हाधिकारी अमरावती यांचे कडील रा.मा.क्र.एन.ए.पी.-३४ /ता.अमरावती /नांदगांव पेठ भाग -२ व बोरगांव धर्माळे -११५/२०१२-२०१३ आदेश पारीत दिनांक २४.०७.२०१३.(पूर्वीचे अकृषक आकारणी आदेश)

२) उपविभागीय अधिकारी अमरावती यांचे रा.मा.क्र.७/एन.ए.पी.-३४/बोरगांव ध. २०१५-२०१६ आदेश पारीत दिनांक २९.०२.२०१६.(वाणिज्य प्रयोजनाकरीता आकारणी आदेश)

मधील रेखांकन व सुधारीत अकृषक आकारणी प्रकरण
रा.मा.क्र./एनएपी-३४/नांदगांव पेठ भाग -२, बोरगाव धर्माळे /१६५ /२०२२ - २०२३

अर्जदार:१) दिपक भगवानदास धामेचा सिटी लँड असोसिएट तर्फे भागीदार,
२) शशी प्रतापराय छतवानी, ३) सुभाष नानकराम तलडा

---

संदर्भ : १) मा.जिल्हाधिकारी अमरावती यांचे पत्र क्रमांक कक्ष-२/अका:नझुल /कावि-७८४/२०१३ दिनांक २०.०५.२०१३.

२) महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग आदेश क्रमांक टिपीएस-१०९३/८१६१/ सीआर नं.३११/९३ युडी -१२ दिनांक १६ डिसेंबर ९३.

३) महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग आदेश क्रमांक टिपीपी-४३९७/१८१९/प्र.क्र.२०१/९७/ नवि - १ दिनांक १० नोव्हेंबर १९९७.

४) सहायक संचालक नगर रचना अमरावती यांचे पत्र क्रमांक अकृषक / मौ. नांदगांव पेठ भाग -२/ ता.जि.अम/स.नं.४५८ व इतर /ससंनर-अम/१८९३, दिनांक २२.०७.२०२२.

५) मा.जिल्हाधिकारी अमरावती यांचे पत्र क्रमांक कक्ष-२/अका./नझूल/कावि ३९६/२०१८ दिनांक १४.०३.२०१८.

## रेखांकन व सुधारीत अकृषक आकारणी आदेश
## (पारीत दिनांक - ०४ / १० /२०२२)

अर्जदार:१) दिपक भगवानदास धामेचा सिटी लँड असोसिएट तर्फे भागीदार २) शशी प्रतापराय छतवानी, ३) सुभाष नानकराम तलडा यांच्या अर्जानुसार

१) मौजे बोरगांव धर्माळे मधील शेत सर्वे नं. ७६ क्षेत्र ०.६० हे.आर.
२) मौजे बोरगांव धर्माळे मधील शेत सर्वे नं. ७७ क्षेत्र २.१४ हे.आर.
३) मौजे नांदगांव पेठ भाग २, मधील शेत सर्वे नं.४५९ क्षेत्र ४.०३ हे.आर.
४) मौजे नांदगांव पेठ भाग २, मधील शेत सर्वे नं.४६०/१, ४६०/१क, ४६०/२ व ४६०/३ क्षेत्र ४.६० हे.आर.
५) मौजे नांदगांव पेठ भाग २, मधील शेत सर्वे नं.४६१/२ क्षेत्र ४.८८ हे.आर.
६) मौजे नांदगांव पेठ भाग २, मधील शेत सर्वे नं.४५८/१ क्षेत्र ०.२८ हे.आर.
७) मौजे नांदगांव पेठ भाग २, मधील शेत सर्वे नं.४५८/१ क्षेत्र १.६२ हे.आर.
८) मौजे नांदगांव पेठ भाग २, मधील शेत सर्वे नं.४५८/२ क्षेत्र १.४२ हे.आर.
९) मौजे नांदगांव पेठ भाग २, मधील शेत सर्वे नं.४६४/१ क्षेत्र १.०१ हे.आर.
१०) मौजे नांदगांव पेठ भाग २, मधील शेत सर्वे नं.४६४/२ क्षेत्र १.६४हे.आर.
११) मौजे नांदगांव पेठ भाग २, मधील शेत सर्वे नं.४६४/३ क्षेत्र १.२६ हे.आर.
१२) मौजे नांदगांव पेठ भाग २, मधील शेत सर्वे नं.४६३/१/अ/१ क्षेत्र ०.८१हे.आर.

..२/-

१३) मौजे नांदगांव पेठ भाग २, मधील शेत सर्वे नं.४६३/१/अ/२ क्षेत्र ०.९७ हे.आर.
१४) मौजे नांदगांव पेठ भाग २, मधील शेत सर्वे नं.४६१/१/अ/३ क्षेत्र ०.८१ हे.आर.
१५) मौजे नांदगांव पेठ भाग २, मधील शेत सर्वे नं.४६३/१क क्षेत्र ०.८० हे.आर.
१६) मौजे नांदगांव पेठ भाग २, मधील शेत सर्वे नं.४६१/१ व ४६१/१ अ क्षेत्र २.१० हे.आर.

मधील शेतजमीन मा.अपर जिल्हाधिकारी अमरावती यांचे कडील रा.मा.क्र.एन.ए.पी.-३४ /ता.अमरावती /नांदगांव पेठ भाग -२ व बोरगांव धर्माळे -११५/२०१२-२०१३ आदेश पारीत दिनांक २४.०७.२०१३ नुसार अकृषक वापराकरीता मंजूर करण्यात आली आहे. उपविभागीय अधिकारी अमरावती यांचे रा.मा.क्र.७/एन.ए.पी.-३४/बोरगांव ध/२०१५-२०१६ आदेश पारीत दिनांक २९.०२.२०१६ नुसार उपरोक्त नमुद सदर क्षेत्र वाणिज्य प्रयोजनाकरीता अकृषक आकारणी करण्यात आले आहे.

मा.जिल्हाधिकारी अमरावती यांचे आदेश क्रमांक क.लि.७/१२ संग/कावि -६१/२०१८ दिनांक ०८.०२.२०१८ नुसार मौजे नांदगांव पेठ भाग २ ता.जि.अमरावती येथील शेत सर्वे नं. ४५८/१, ४५८/२, ४५९, ४६०/१, ४६०/१ क, ४६०/२, ४६०/३, ४६१/२, ४६४/१, ४६४/२, ४६४/३, ४६३/१अ/१, ४६३/१अ/२, ४६३/१अ/३, ४६३/१क, या एकूण सर्वे नं. चे मिळून क्षेत्र २४.१३ हे.आर. या जमीनीला एकच सर्वे नं. देण्याबाबत तहसिलदार अमरावती यांनी प्रस्तावित केल्यावरुन या मालीकेतील पहिला सर्वे नं. ४५८ क्षेत्र २४.१३ हे.आर. असा एक सर्वे नं. ४५८ क्षेत्र २४.१३ हे.आर. देण्यात आला.

मौजे नांदगांव पेठ भाग -२, व मौजे बोरगांव धर्माळे येथील उपरोक्त नमुद शेत सर्वे नं. मधील जमीन यापूर्वीच वाणिज्य प्रयोजनाकरीत अकृषक रुपांतरीत झालेली आहे. अर्जदार यांना उपरोक्त नमुद अकृषक झालेल्या जमीनीमधील अकृषक रेखांकनाच्या क्षेत्रात सुधारणा (बदल) करावयाचे आहेत. त्याचप्रमाणे मौजे नांदगांव पेठ भाग २ मधील शेत सर्वे नं.४५८ मधील यापूर्वी मंजूर अभिन्यासातील प्लॉट क्र. ८०१ मध्ये सुधारीत रेखांकन करावयाचे असल्यामुळे विनंती अर्ज या कार्यालयास दाखल केला आहे.

अर्जदार यांनी अर्जासोबत मौजे नांदगांव पेठ भाग -२ येथील सर्वे नं.४५८ मधील प्लॉट क्र. ८०१ क्षेत्र ५०५.५१.०२ चौ.मि.या शेतजमीनीचे गांव नमुना ७/१२, प्रस्तावित सुधारीत रेखांकन अभिन्यास नकाशा इत्यादी सादर केले आहे.

सहायक संचालक नगर रचना अमरावती यांचे पत्र क्रमांक अकृषक / मौ. नांदगांव पेठ भाग -२/ ता.जि.अम/स.नं.४५८ व इतर /ससंनर-अम/२३७८ दिनांक १०.१२.२०२१ नुसार तात्पुरते सिमांकनाची शिफारस केली.

SUB-DIVISIONAL OFFICER ★ AMRAVATI ★ सत्यमेव जयते

सदर प्रकरणी अर्जदार यांनी अर्ज सादर करुन त्यांना सिमांकीत नकाशाची मोजनी क प्रत प्राप्त झाली आहे ती सहायक संचालक नगर रचना अमरावती यांना पाठविण्याबाबत या कार्यालयास पत्र दिले त्यानुसार या कार्यालयाचे पत्र क्रमांक प्रस्तु-१/अकृ.आका./नांदगांव पेठ / कावि २४२५/२०२२ दिनांक १४.०६.२०२२ नुसार सहायक संचालक नगर रचना अमरावती यांना पत्र देण्यात आले.

सहायक संचालक नगर रचना अमरावती यांचे पत्र क्रमांक अकृषक / मौ. नांदगांव पेठ भाग -२/ ता.जि.अम/स.नं.४५८ व इतर /ससंनर-अम/१८९३, दिनांक २२.०७.२०२२ नुसार मौजे नांदगांव पेठ भाग २ ता.जि.अमरावती येथील शेत सर्वे नं. ४५८ मधील प्लॉट क्र. ८०१ मध्ये अभिन्यास नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे भुखंडाची आखनी करुन सुधारीत आखणीस अटी व शर्तीच्या आधारे नकाशांना खालीलप्रमाणे अंतिम मंजूरीची (Recommended for Final Approval) शिफारस केली आहे.

## Area Statement of Land

**Mouje Nandgaon Peth Part २**

Surve No ४५८-------------------- Area २४.१३ H.R.
Surve No ४६१/१------------------- Area ०१.०५ H.R.
Surve No ४६१/१/A--------------- Area ०१.०५ H.R.

**Mouje Borgaon Dharmale**

Gat No ७६----------------------- Area ००.६० H.R.
Gat No ७७----------------------- Area ०२.१४ H.R.

Total Land Area २८.९७ H.R

..३/-

| अ.क्र. | जमीन वापराचा तपशिल | क्षेत्र चौ.मि. | अकृषक प्रमाणे दर प्रति चौ.मि.रु. ०.२०/- | अकृषकआकारणी रुपये |
|---|---|---|---|---|
| 1 | Area Under National Highway | 1400.00 | 0.20 | 280.00 |
| 2 | Recreation Open Space<br>Open Space 1.Area 4691.00Sq.Mt.<br>Open Space 2.Area 11092.95Sq.Mt.<br>Open Space 3.Area 4004.52Sq.Mt.<br>(For p.s.s As Per Rule 3.4.7(ii))<br>Open Space 4.Area 2034.625Sq.Mt.<br>Open Space 5.Area 4396.98Sq.Mt.<br>Open Space 6.Area 2670.91Sq.Mt. | 28890.98 | 0.20 | 5778.19 |
| 3 | Amenity Space | 28881.29 | 0.20 | 5776.25 |
| 4 | Area Under Internal Road | 48614.23 | 0.20 | 9722.84 |
| 5 | Area Under Layout Plots | 181913.50 | 0.20 | 36382.70 |
| | एकुण रुपांतरीत क्षेत्र | 289700.00 | -- | -- |

खुली जागा व रस्त्याखालील जागा सार्वजनीक कामाकरिता वापरावयाची असल्याने अकृपीक आकारणीत खालील प्रमाणे क्षेत्रास सुट देण्यात येत आहे.

| अ.क्र. | जमीन वापराचा तपशिल | क्षेत्र चौ.मि. |
|---|---|---|
| 1 | Area Under National Highway | 1400.00 |
| 2 | Recreation Open Space<br>Open Space 1.Area 4691.00Sq.Mt.<br>Open Space 2.Area 11092.95Sq.Mt.<br>Open Space 3.Area 4004.52Sq.Mt.<br>(For p.s.s As Per Rule 3.4.7(ii))<br>Open Space 4.Area 2034.625Sq.Mt.<br>Open Space 5.Area 4396.98Sq.Mt.<br>Open Space 6.Area 2670.91Sq.Mt. | 28890.98 |
| 3 | Area Under Internal Road | 48614.23 |
| 4 | एकुण रुपांतरीत क्षेत्र | 78905.21 |

Area Statement of Amenity Plots

| Plot No. | Area Sq.Mt. | Less Curve | Net Plot Area | Nos. | Total Area |
|---|---|---|---|---|---|
| 794 | 510.00 | 0.00 | 510.00 | 1 | 510.00 |
| 795 | 9559.30 | 0.00 | 9559.30 | 1 | 9559.30 |
| 799 | 9252.68 | 0.00 | 9252.68 | 1 | 9252.68 |
| 800 | 9559.30 | 0.00 | 9559.30 | 1 | 9559.30 |
| Total | | | | 4 | 28881.28 |

**Area Statement of Plots**

| Plot No. | Area Sq.Mt. | Less Curve | Net Plot Area | Nos. | Total Area |
|---|---|---|---|---|---|
| 1 to 336 | 38721.39 | | 38721.39 | 1 | 38721.39 |
| 802 | 6752.01 | | 6752.01 | 1 | 6752.01 |
| 803 | 7783.08 | 14.75 | 7768.33 | 1 | 7768.33 |
| 804 | 4303.57 | 14.75 | 4288.82 | 1 | 4288.82 |
| 805 | 23417.00 | | 23417.00 | 1 | 23417.00 |
| 806 | 1444.72 | 105.59 | 1339.13 | 1 | 1339.13 |
| 796 | 4449.12 | 12.58 | 4436.54 | 1 | 4436.54 |
| 797 | 34533.77 | 37.97 | 34495.80 | 1 | 34495.80 |
| 798 | 60694.47 | | 60694.47 | 1 | 60694.47 |
| | | | Total | 8 | 181913.50 |

..४/-

**<u>सहायक संचालक नगर रचना अमरावती यांच्या कार्यालयाव्दारे निदेशित</u>**

१. यापूर्वी सहायक संचालक नगर रचना अमरावती यांचे पत्र क्र.४५३ दि. २०.०२.२०१६ रोजी शिफारस केलेल्या अभिन्यास नकाशामध्ये आता प्रस्तावित केलेला बदल कायम राहील.

२. विषयांकित प्रकरणांतर्गत जागेच्या अधिकृत मालकी हक्क व पोट हिस्स्याबाबत तसेच अधिकृत पोच रस्त्याबाबत महसूल विभागाने प्रथमत: शहनिशा करुन पुढील कार्यवाही करणे अभिप्रेत व आवश्यक आहे.

३. अभिन्यासातील खुली जागा, रस्ते यांचा त्याच वापराकरीता व अभिन्यासातील प्रस्तावित भुखंडाचा उपयोग निवासी या वापराकरीता करणे अर्जदार जमिनमालक / विकासकर्ते यांचेसह सर्वसंबधितावर बंधनकारक आहे व राहील.

४. भविष्य काळात अभिन्यासातील भूखंडाचे पुर्व परवानगीशिवाय विभाजन करण्यात येऊ नये.

५. यापुर्वी स.नं. ४५८/१, ४५८/२, ४५९, ४६०/१, ४६०/१ क, ४६०/२, ४६०/३, ४६१/२, ४६४/१, ४६४/२, ४६४/३, ४६३/१३अ/१, ४६३/१३अ/२, ४६३/१३अ/३, ४६३/१ यामधील प्लॉट क्र. ८०१ मा.जिल्हाधिकारी अमरावती यांचे आदेशानुसार सुधारीत केलेला स.नं.४५८मधील भुखंड क्र.८०१मध्ये अभिन्यास नकाशामध्ये दर्शविल्या प्रमाणे भुखंडाची आखणी करुन सुधारीत नकाशावर आखनी करतांना जागेच्या लगतच्या जमिनधारकाचे हिसंबध बाधित होत असल्यास व त्याबाबत कोणताही वाद उद्‌भवल्यास व अशा वादामध्ये तथ्य आढळल्यास सदरची सिमांकनाची तात्पुरती शिफारस तात्काळ व आपोआप रद्य समजन्यात येईल.

६. प्रकरणांत अर्जदार जमीनमालक / विकासकर्ते यांनी दाखल केलेल्या मोजनी नकाशाप्रमाणे दर्शविलेला पोट हिस्सा / वहिवाट ग्राहय धरुन त्याचबरोबर प्रस्तुत सिमांकित भूमि अभिलेख विभागाकडील मोजनी नकाशाच्या हद्दीत व प्राप्त अभिन्यास नकाशाच्या हद्दीत तफावत असल्यास प्राप्त अभिन्यास नकाशा विचारात घेऊन विकास परवानगी देण्यापूर्वी उपअधिक्षक, भूमि अभिलेख, अमरावती यांचेकडून मोजनी नकाशात दुरुस्ती करुन घेणे या अटीसापेक्ष प्रस्तुत सिमांकित नकाशांना मंजूरीची शिफारस करण्यात येत आहे. या सिमांकित नकाशामुळे जागेच्या लगतच्या जमिनधारकांचे हितसंबध बाधित होत असल्यास व त्याबाबत कोणताही वाद उद्‌भवल्यास व अशा वादामध्ये तथ्य आढळल्यास सदरची अंतिम मंजूरीची शिफारस (Recommedned for final Approval) आपोआप रद्दबातल समजन्यात येईल.

७. सदरहु प्रकरणांत अभिन्यास नकाशांना नगर रचनेच्या दृष्टीकोणातून अंतिम मंजूरीची शिफारस करतांना तसेच, निवासी वापराकरीता अकृषक मध्ये रुपांतर करण्यास नगर रचनेच्या दृष्टीकोनातून शिफारस करतांना अर्जदार जमिनमालक / विकासकर्ते यांनी प्रकरणासोबत दाखल केलेली मालकी हक्काची कागदपत्रे व मोजनी नकाशा इत्यादी कागदपत्रे ग्राहय धरण्यात आली आहेत. सदर कागदपत्रे खोटी व दिशाभूल करणारी आढळल्यास उक्त अट क्रमांक ५ व ६ मध्ये नमुद नुसार तथ्य आढळल्यास सदर शिफारस तात्काळ रद्दबातल समजन्यात येईल. त्याचबरोबर भविष्य काळात या अनुषंगाने कोणतीही तक्रार वा न्यायालयीन वाद उद्‌भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार /जमीन मालक /विकासकर्त्याची राहील. व तशा तक्रारीस वा न्यायालयीन वादास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. तसेच सदर प्रकरणाच्या अनुषंगाने भविष्यात अधिमुल्य व अतिरीक्त विकास शुल्क भरण्याची आवश्यकता असल्यास भरणा करण्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार जमिनमालक / विकासकर्ते यांची राहील.

८. महाराष्ट्र शासनाचे धोरणांनुसार व मा.जिल्हाधिकारी यांचे निर्देशानुसार अभिन्यासातील भुखंडावर बांधकाम नियोजित करतांना छतावरील पावसाचे पाणी संकलन करुन त्याचे जमीनीमध्ये पुनर्भरण करणेच्या प्रकल्पामध्ये बांधकाम करणे सर्वसंबधित अर्जदार जमिनमालक / विकासकर्ते यांचे सह सर्व संबधितावर बंधनकारक राहील.

९. उक्त जागेच्या नियोजित नकाशात नमुद असलेल्या कारणाव्यतीरिक्त अन्य वापर करावयाचा झाल्यास अथवा वापरात बदल करावयाचा झाल्यास अशा प्रस्तावित वापरात बदल करावयाचा

SUB-DIVISIONAL OFFICER AMRAVATI सत्यमेव जयते

..५/-

झाल्यास अशा प्रस्तावित वापर बदलास विहितरित्या सक्षम महसूल / स्थानिक प्राधिकारणाची पूर्व परवानगी घेणे अर्जदार / जमीनमालक / विकासकर्त्यासह सर्व संबधितावर बंधनकारक आहे व राहील.

१०. अभिन्यासात विद्युत दाब वाहिनी असल्यास अर्जदार जमिनमालक / विकासकर्ते यांनी स्वखर्चाने रस्त्याचे बाजुने प्रथमतः स्थलांतरीत करुन घेणे आवश्यक व बंधनकारक आहे व राहील. अन्यथा अशा विद्युत वाहिन्यापासून नियमानुसार विहीत सामाईक अंतरे प्रस्तावित करुनच भविष्यकाळात विकास अनुज्ञेय राहील. त्यानुषंगाने जरुरीप्रमाणे संबधीत विद्युत विभागाकडील नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेऊन ते उपलब्ध्द करुन देणे अर्जदार जमीनमालक / विकासकर्ते यांचेवर बंधनकारक राहील.

११. महाराष्ट्र जमीन महसूल नियम १९६९ (जमीनीच्या वापरातील बदल व अकृषक कर आकारणी) च्या नियम क्र. ४ च्या अटींचे पालन करणे अर्जदार जमिनमालक / विकासकर्त्यावर बंधनकारक राहील.

१२. अर्जदार / विकासकर्ते / जमिनमालकांनी सदर जागेतील वृक्षांचे संरक्षण करणे आवश्यक व बंधनकारक आहे व राहील. तसेच नियमाप्रमाणे प्र.हे.वृक्ष लागवड करणे आवश्यक व बंधनकारक राहील.

१३. जागेमधील पावसाचे पाणी / सांडपाण्याचा निचरा योग्यप्रकारे करण्याकरीता योग्य उपाययोजना करणे अर्जदार जमिनमालक / विकासकर्ते यांनी करणे बंधनकारक व आवश्यक राहील.

१४. एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील नियमास अनुसरून अर्जदार जमिनमालक / विकासकर्ते यांनी प्रस्तावित अभिन्यासाखालील जागेतील इतर पायाभूत सुविधा सुयोग्यरित्या विकसीत करणे आवश्यक व बंधनकारक आहे व राहील.

१५. महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाचे शासन निर्णय क्रमांक : टिपीएस-१८१९/अनौस -३६/१९/नवि-१३ दिनाक ०५.०८.२०१९ मध्ये नमुद केलेल्या पथकिनारवर्ती नियमात व त्या सबंधाने वेळोवेळी निर्गमित झालेल्या शासन निर्णय परिपत्रकामध्ये नमुद केल्यानुसार सदर इमारत रेषा व नियंत्रण रेषा यांची अंतरे विहीत करण्यात आली आहेत. त्यानुसार सदर अभिन्यासातील भुखंडामध्ये बांधकाम / विकास करतांना त्यांचे पालन करणे अर्जदार जमीन मालक / विकासकर्त्यांसह सर्व संबधीतावर बंधनकारक राहील.

**तसेच महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ व (जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी नियम १९६९) मधील तरतुदीनुसार**

१. अर्जित शेतजमीन मधील वाणिज्य वापराकरीता ***एकूण क्षेत्र १८१९१३.५० चौ.मि.*** जागेवर अकृषक कर **रु. ३६३८२.७०/-** + **ॲमेनीटी स्पेस क्षेत्रफळ २८८८१.२९ चौ.मि.**जागेवर अकृषक कर **रु. ५७७०.२५/-** असे एकुण वार्षीक अकृषक आकार **रु. ४२१५२.९५/-** (पूर्णांकात ४२१५३.००/-) रु.कायम करण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य राजपत्र दिनांक २३ ऑक्टोंबर २००७ मध्ये प्रसिध्द झाल्यानुसार आकारण्यात येत आहे. त्यानंतर जी सुधारीत आकारणी शासन घोषीत करील, त्याप्रमाणे भरण्यास अर्जदार बंधनकारक राहील.

२. मंजूर अभिन्यासाप्रमाणे अर्जदारास सन **२०२२-२३** पासून वार्षीक अकृषक कर रुपये **४२१५९.००/-**,जि.प. कर रुपये **२९५११३.००/-**, ग्राम पंचायत कर रु. **४२१५९.००/-** असे एकूण रक्कम **३७९४३१.००/-** रु. (अक्षरी रु.तिन लक्ष एकोणअंशी हजार चारसे एकत्तीस रुपये फक्त) चा भरणा करावा लागेल.**(रूपांतरीत कराचा भरणा यापुर्वीच उपविभागीय अधिकारी यांचे वाणिज्य प्रयोजनाकरीता वापरात बदल आकारणी प्रकरण रा.मा.क्र.७/एन.ए.पी-३४/नांदगांव पेठ भाग-२ व बोरगांव धर्माळे/२०१५-२०१६ आदेश पारित दिनांक-२९.०२.२०१६) नुसार व मा.अपर जिल्हाधिकारी यांचे अकृषक आदेशा नुसार भरणा करून घेण्यात आले आहे.त्यामुळे पुन्हा रूपांतरीत कराची आकारणी घेण्यात आली नाही.)**

३. उपरोक्त नमुद क्षेत्र २८.९७ हे.आर.शेतजमीन वाणिज्य प्रयोजनाकरीता अकृषक रेखांकन आदेश मंजूर झाल्याच्या आदेशाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत निवासी प्रयोजनाकरीता प्लॉटचे फेरफार करुन घेण्यात यावे. व वाणिज्य प्रयोजनाकरीता वापरात आनने बंधनकारक आहे. अन्यथा अकृषक आदेश रद्दबातल समजन्यात येईल.

४. मंजूर अभिन्यासातील रस्ते, खुली जागा, सार्वजनिक सुविधा अंतर्गत प्लॉट क्षेत्र नियमानुसार अर्जदार यांना संबधीत स्थानिक प्राधिकरणास हस्तांतरीत करणे अर्जदार/ जमीनमालक / विकासकर्ते यांना बंधनकारक राहील त्या शिवाय प्लॉटची विक्री करण्यात येऊ नये.

५. यापुर्वीचे वाचा आदेश क्र.१ व २ मधील अटी व शर्ती व सोबतच या आदेशानुसारच्या अटी व शर्ती तशाच कायम राहील.

सदर प्रकरणी अर्जदार यांचा अर्ज, सहायक संचालक नगर रचना अमरावती यांचे पत्र क्रमांक अकृषक / मौ. नांदगांव पेठ भाग -२/ ता.जि.अम/स.नं.४५८ व इतर /ससंनर-अम/१८९३, दिनांक २२.०७.२०२२ अन्वये मंजूर नियोजन अभिन्यासाप्रमाणे व तरतुदीअन्वये त्याचप्रमाणे आदेशामधील संदर्भिय क्र १ ते ३ मधील तरतुदी अन्वये मौजे नांदगांव पेठ भाग -२, ता.जि.अमरावती येथील शेत सर्वे नं. ४५८, ४६१/१, ४६१/१/ अे आणि मौजे बोरगांव धर्माळे ता.जि.अमरावती येथील शेत गट नं. ७६, ७७ मधील एकुण क्षेत्र २८.९७ हे.आर. शेतजमीन अकृषक आकारणी व अकृषक रेखांकन निश्चीत करण्यात येत आहे. अर्जदार यांनी अकृपक आकारणी कर भरणा करणे व जमीन विकासाच्या दृष्टीने सहायक संचालक नगर रचना अमरावती तसेच प्रस्तुत आदेशात नमुद केलेल्या अटी व शर्ती व निर्देशांचे पालन करणेच्या अटीवर सुधारीत अकृषक आकारणी व रेखांकन आदेश पारीत करण्यात येत आहे.

स्वा/

उपविभागीय अधिकारी तथा
नियोजन प्राधिकारी अमरावती

<u>प्रतिलीपी -</u>

१. तहसिलदार, अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव अग्रेपित.

२. उपअधिक्षक भुमी अभिलेख अमरावती यांना अभिलेख दुरुस्ती करीता व कमी जास्त पत्रक दुरुस्तीकरीता माहिती व उचित कार्यवाहीस्तव अग्रेपित.

३. सहायक संचालक नगर रचना आणि मुल्य निर्धारण विभाग, शाखा कार्यालय, अमरावती.

४. मंडळ अधिकारी / तलाठी मौजा नांदगांव पेठ भाग -२, बोरगांव धर्माळे, ता.जि.अमरावती यांना अभिन्यास मंजूर प्रतीसह तसेच मंजूर रेखांकन आदेशाची अंमलबजावनी करुन रेकॉर्ड दुरुस्ती करावी. तसेच सदर आदेशाप्रमाणे अकृषक कर दरवर्षी वसूल करावा. आणि केलेल्या कार्यवाहीचा सुधारीत अहवाल ७/१२ व गांव नमुना ६ च्या उता-यासह कार्यालयात सादर करावा. गांव नमुना ७ भुखंड निहाय करावे. खुल्या जागेकरीता वेगळा नमुना तयार करावा. त्यात मुळ सर्वे नंबर देऊन जागेचा वेगळा क्रमांक देण्यात यावा. जेणेकरुन संदर्भ देणे सोईस्कर होईल.

५. ग्राम विकास अधिकारी, नांदगांव पेठ, बोरगांव धर्माळे, ता. जि. अमरावती यांना माहिती करीता.

६. अर्जदार:१) दिपक भगवानदास धामेचा सिटी लँड असोसिएट तर्फे भागीदार,२) शशी प्रतापराय छतवानी, ३) सुभाष नानकराम तलडा

SUB-DIVISIONAL OFFICER
सत्यमेव जयते
AMRAVATI

उपविभागीय अधिकारी तथा
नियोजन प्राधिकारी अमरावती